CNR NO. MHPU100001812023

| दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पी.सी.एम.सी. न्यायालय, आकुर्डी, पुणे यांचे न्यायालयासमोर |
|---|
| **दिवाणी दावा क्र. ७०/२०२३** |
| **<u>मुबारक अब्बास शेख</u>** |
| वि. |
| **<u>पिं.चि.मनपा व इतर</u>** |

## <u>नि.क्र. ६६ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज हा वादीने प्रतिवादी क्र.५ यांनी दि.१०/०६/२०२३ रोजीच्या हिबानाम्याचा मुळ दस्त प्रकरणात दाखल करण्याचा आदेश व्हावा याकरिता सादर केलेला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी क्र.५ ने त्याचा खुलासा सादर केला व सदर अर्जास ठाम विरोध दर्शविला.

३. वादीचे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, वाद मिळकत ही प्रतिवादी क्र. ५ ने दि. १०/०६/२०२३ रोजी हिबानामा करुन त्यांचा नातु शोयेब अब्दलुगणी शेख यांचे नावे हस्तांतरित केली असा मजकुर त्यांनी परिच्छेद क्र.४० लेखी जबाबात नमुद केला. त्यामुळे वाद मिळकतीत आता प्रतिवादी क्र.५ चा कुठलाही हक्क व अधिकार राहिलेला नाही. सदरचा हिबानाम्याचा दस्त हा महत्वपुर्ण पुरावा असुन तो प्रकरणात

दाखल करावा अशा प्रकारचा आदेश व्हावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी क्र.५ ने सदर अर्जास ठाम विरोध दर्शविला व असे कथन केले की, प्रतिवादी क्र.५ ने वाद मिळकतचा जो हिबानामा केला आहे तो दस्त आता त्याचा नातु शोयेब अब्दलुगणी शेख याचे ताब्यात आहे. प्रतिवादी क्र. ५ याचे ताब्यात नाही. त्यामुळे सदरचा दस्त प्रतिवादी क्र.५ ने दाखल करावा म्हणुन सदरचा अर्ज रद्द करावा अशी विनंती केली.

५. संपुर्ण अभिलेख पाहिला. दावा हा घोषणा व निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.५ हे वादीचे वडील आहेत. वाद मिळकतीचे संदर्भात प्रतिवादी क्र.५ ने हिबानामा दि.१०/०६/२०२३ रोजी केल्याचे प्रतिवादी क्र.५ ने सुध्दा मान्य केले आहे. परंतु प्रतिवादी क्र.५ चे युक्तीवादानुसार सदरचा हिबानामा त्याच्या ताब्यात नाही हे सुध्दा खरे आहे. सामान्यतः एखादा दस्त तयार झाल्यानंतर तो ज्याचे अधिकारात केलेला आहे त्याचे ताब्यात तो मुळ दस्त असतो. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.५ ने त्याचा नातु शोयेब अब्दलुगणी शेख याचे नावे तो दस्त करुन दिलेला आहे. त्यामुळे साहजीकच तो दस्त शोयेब अब्दलुगणी शेख याचे ताब्यात आहे असे प्रथमदर्शनी अनुमान काढता येते. सदर प्रकरण ब-याच दिवसांपासुन नि.क्र.५ वर युक्तीवादाकरिता प्रलंबित आहे. वाद मिळकतीसंदर्भात जो हिबानामा झाला आहे. त्याची आवश्यकता प्रकरण पुराव्यास लागल्यानंतर आहे. सदय परिस्थीतीत वादी यांनी नि.क्र. ५ चालविणे आवश्यक असुन, तो चालविणेकामी

आवश्यक ती प्रक्रिया तसेच दस्त याचेवर भर देवुन नि क्र.५ चालविणे योग्य राहिल. त्यामुळे सदय परिस्थितीत प्रतिवादी क्र.५ यांनी हिबानामा दि.१०/०६/२०२३ रोजीचा मुळ दस्त प्रकरणात दाखल करण्याचा आदेश देणे उचीत होणार नाही. मात्र मुद्दे काढल्यानंतर सदर प्रकरचा अर्ज करण्याची वादीस मुभा राहिल. वरील चर्चा विचारात घेवुन खालील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

वादीचा अर्ज (नि.क्र.६५) फाईल करण्यात येतो.

सही/–

आकुर्डी, पुणे. (व्ही. एस. डामरे)

दिनांक २४/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, आकुर्डी, पुणे.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order.

Name of Stenographer :- P. B. Jadhav (Grade III)

Court Name :- Shri. V. S. Damare,
Civil Judge Junior Divison,
(P.C.M.C. Court), Akurdi,
Pune.

Date :-24/04/2026
Judgment signed by presiding officer on :- 24/04/2026
Judgment uploaded on :- 24/04/2026